लोकमत पू. पान क्र. १



हातभट्टीच्या दारूची भिवंडीतून भाईंदरला तस्करी करणाऱ्या दोघांना अटक केली.

# भाईंदरमध्ये तस्करी, हातभट्टीची दारू जप्त

## दोघांना अटक : भाईंदर पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** बंदी असलेल्या गावठी हातभट्टीच्या दारूची भिवंडीतून भाईंदरमध्ये तस्करी केली जात असल्याचे उघडकीस आले असून भाईंदर पोलिसांनी ४०० लिटर गावठी हातभट्टी दारूसह दोघांना अटक केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयातील अवैध धंद्यांवर आणि गुन्हेगारांवर आळा बसविण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार भाईंदर पोलिस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक रात्री गस्त घालत होते. त्यावेळी हवालदार के.पी. पवार यांना त्यांच्या खबरीमार्फत चंदेरी रंगाच्या गाडीतून गावठी हातभट्टीची दारू मोरवा गावाच्या दिशेने जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहायक आयुक्त दीपाली खन्ना, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी, पोलिस निरीक्षक विवेक सोनवणे व सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक नरोटे यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण शाखेचे राजेश श्रीवास्तव, के.पी. पवार, के.आर. पवार, रामनाथ शिंदे, सुशील पवार, संजय चव्हाण यांच्या पथकाने नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ सापळा रचला. १९ मार्चच्या मध्यरात्री चंदेरी रंगाची संशयित कार येताच तिला थांबवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला, परंतु कारचालक कार पळवून नेण्याच्या प्रयत्नात असतानाच पोलिसांनी ती अडवली. पोलिसांनी कार चालकाकडे चौकशी केली असता त्याने मच्छिंद्र लहू मढवी (वय ४०) अशी ओळख स्वतःची व बाजूला बसलेल्याचे नाव सूरज सुनील कोळी (२४, दोघे, रा. अंजुरगाव, भिवंडी) असल्याचे सांगितले.

### डिकीत आढळल्या दारूच्या १० गोण्या

१ गाडीची तपासणी केली असता डिकीमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गावठी हातभट्टी दारू भरलेली आढळून आली. १० गोण्या भरून एकूण ४०० लिटर गावठी हातभट्टी दारू असून तिची आणि वाहनाची मिळून किंमत २ लाख १५ हजार रुपये इतकी आहे.

२ पोलिसांनी गावठी दारू व वाहन जप्त करून मढवी व कोळी यांना अटक करत भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गावठी हातभट्टीची दारू भिवंडीवरून तस्करी करून भाईंदरच्या मोरवा गावातील गावठी दारू विक्रेत्यास देण्यासाठी आरोपी आले होते.

# मीरा-भाईंदरसह वसई, विरारचे पोलिस सज्ज

## ठिकठिकाणी गस्तीसह नाकाबंदी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** होळी, धूलिवंदनाच्या सणाला शहरांमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडून गालबोट लागू नये, यासाठी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील पोलिस सज्ज झाले आहेत. मुली व महिलांवर फुगे आणि पिशव्या मारणाऱ्यांना अटक करून कडक कारवाई केली जाणार आहे. याकरिता स्थानिक पोलिस ठाण्याच्या पोलिसांची बीटनुसार पथके आपापल्या हद्दीत गस्त ठेवणार आहेत, तसेच नाकाबंदीसुद्धा केली जाणार असून ड्रंक अँड ड्राइव्हच्या केसेस करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

पोलिस ठाणे हद्दीतील मुख्य नाक्यावर पोलिस अधिकारी आणि पोलिस कर्मचाऱ्यांसह होमगार्ड असा मोठा पोलिस फौजफाटा तैनात केला जाणार आहे. होळी, रंगपंचमीच्या दिवशी संपूर्ण शहरात नाकाबंदी लावणार असून मद्य पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार आहे. अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अर्नाळा, कळंब आणि राजोडी हे तीन बीच येत असून रंगपंचमीच्या दिवशी समुद्रकिनारी हजारोंच्या संख्येने स्थानिक व पर्यटक अंघोळीसाठी व मौजमजेसाठी येतात. यामुळे पोलिस समुद्रकिनारी पहारा ठेवणार असून बोट पेट्रोलिंगही करणार असल्याचे सांगितले आहे.



मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरांत सार्वजनिक होळी व खासगी होलिकोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. होळीसह धूलिवंदनाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरिता पोलिस दल सतर्क आहे. कुठेही अनुचित प्रकार घडू नये, तसेच सणाला गालबोट लागू नये, याची दक्षता घेतली जाणार आहे.

- पोलिस प्रशासन


CamScanner

लोकमत पू. पान क्र. १

## अल्पवयीन भावांचे अपहरण

नालासोपारा : शहराच्या धानिवबाग तलावाजवळील रामधनी नगर परिसरात राहणाऱ्या १० आणि ८ वर्षांच्या दोन सख्ख्या भावांचे गुरुवारी सकाळी अपहरण झाल्याची घटना घडली आहे. घटनेच्या दिवशी या मुलांचे आई, वडील दोघेही कामावर गेले होते. याचाच गैरफायदा घेऊन अज्ञात आरोपीने त्यांचा अज्ञानाचा फायदा घेऊन कशाचे तरी आमिष दाखवून त्यांना पळवून नेले असावे, अशी तक्रार त्या मुलांच्या आईने शुक्रवारी पेल्हार पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेऊन आत्महत्या



नालासोपारा : साकाईनगर येथील उमेळा पार्कच्या साकाई प्रसन्न सोसायटीत राहणारे हनमंत बालगुडे (४२) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी शुक्रवारी कोणत्यातरी कारणावरून छताच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला आहे. घरातील व्यक्तींनी त्यांना नवघर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. माणिकपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## मुलीवर अत्याचार



नालासोपारा : वसईत सावत्र बापाने जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२३ दरम्यान १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला आहे. याबाबत पीडित मुलीने सावत्र आईला सांगूनही तिनेही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. पीडित मुलीने शुक्रवारी माणिकपूर पोलिस ठाण्यात हकीकत सांगून तक्रार दिली. आरोपी सावत्र बाप, सावत्र आईविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## अडीच लाखांचे गोमांस जप्त

नालासोपारा : शुक्रवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सोपारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर साईनगर समोरील रस्त्यावर तेराशे किलो वजनाचे गोमांस जप्त केले आहे. जनावरांचे मांस विक्रीसाठी टेम्पोमध्ये भरुन विनापरवाना बेकायदेशीररीत्या घेऊन जाताना पोलिसांना आढळले. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी २ लाख ३४ हजार रुपये किमतीचे गोमांस व ४ लाखांचा टेम्पो असा ६ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फिरोज पोजी (५२) व सिकंदर शेख यांच्याविरोधात पोलिस प्रेम घोडेराव (३३) यांनी नालासोपारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## रिक्षा, दुचाकीला धडक देऊन कारचालक पसार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : मीरारोडच्या व्ही पॉवर जिमजवळ शुक्रवारी रात्री एका कारचालकाने भरगाव वेगात कार चालवत एका दुचाकी व एका रिक्षास जोरदार धडक देऊन अपघात केला. त्या अपघातात दुचाकीचालक तसेच रिक्षाचालक अनिल कदम (रा.लोढा हेवन, निळजे, डोंबिवली) हे जखमी झाले. कदम यांच्या फिर्यादीवरून मीरारोड पोलिसांनी कार चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## महामार्गावर जबरी चोरी

नालासोपारा : मुंबई अहमदाबाद महामार्गावरील विरार फाटा ब्रीज येथे गुरुवारी रात्री जबरी चोरीचा प्रकार घडला आहे. काशिगांवच्या मांडवीपाडा चाळीत राहणारे गोपाल सहानी (३१) हे घटनेच्या दिवशी वापी येथून टेम्पोमध्ये कपड्याचे बंडल, पानमसाला घेऊन मुंबईकडे निघाले होते. खानिवडे टोल नाक्याच्या थोडे पुढे गेल्यानंतर एका कारने पाठलाग करून विरार फाट्याच्या पुढे कार टेम्पोच्या पुढे आडवी लावली. कारमधील आरोपी अजय पाटील, पिंटू पाटील व त्यांच्यासोबत असलेले दोघे असे चौघांनी जबरदस्तीने गोपाल यांच्या टेम्पोची चावी जबरीने घेऊन गेले. गोपाल यांनी २ लाख ४० हजारांचा मुद्देमाल चोरून नेल्याची तक्रार देत गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. १

# जबरी चोरीच्या गुन्ह्यात फरार; ५ वर्षांनंतर अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका इसमास मारहाण करून त्याच्याकडील रोख व महत्त्वाचे ओळख कार्ड बळजबरीने लुटल्याच्या गुन्ह्यातील गेल्या ५ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला काशीगाव पोलिसांनी अटक केली आहे.

गुजरातच्या अहमदाबाद शहरातील स्वामी नारायण मंदिराजवळ आरती पॅलेसमध्ये राहणारे योगेशकुमार पटेल यांना मुबारक अली कमजुमा खान, अंकुश अनिलभाई अगरवाल, लल्लू यांनी वरसावे नाका येथील फाऊंटन हॉटेल येथे बोलावून त्यांना मारहाण केली. त्यांच्याकडील ६० हजार रोख, पॅन कार्ड, आधार कार्ड जबरदस्तीने काढून घेतले. याप्रकरणी काशीमीरा पोलिस ठाण्यात १३ मार्च २०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मुबारक अली (४८, रा जोगेश्वरी) व अंकुश अगरवाल (२४, रा. शीतल सोसायटी, गांधी चौक, नंदुरबार) या दोघांना मुद्देमालासह पोलिसांनी अटक केली होती.




## पाठलाग करून पकडले

■ लल्लू हा मात्र पोलिसांना सापडला नव्हता. परिमंडळ १ चे पोलिस उपआयुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे ऑल आउट ऑपरेशन दरम्यान आरोपी नामे लल्लू हा निलकमल नाका बाजारात असल्याची बातमी गुप्त बातमीदारमार्फत काशीगाव पोलिसांना मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरात शोध घेत लल्लूला गाठला असता पाठलाग करून पकडले.

■ लल्लूचे खरे नाव सत्यनारायण राम कैलास पाल (४४) असून, तो ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करत पखंदा आर. डी. रोड, बमन की पाडा जवळ, ओवळा, ठाणे येथे राहत होता. गेल्या ५ वर्षांपासून तो पोलिसांना गुंगारा देत वावरत होता.

लोकमत पू. पान क्र. ३

# मीरा रोडमध्ये वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांती शॉपिंग सेंटर समोरील रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ५५ ते ६० वर्षांच्या एका अनोळखी इसमास अज्ञात वाहन चालकाने दिलेल्या धडकेत त्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. धडक देऊन तो वाहनचालक मात्र पसार झाला. नयानगर पोलिसांनी याप्रकरणी शुक्रवार २२ मार्च रोजी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



CamScanner

लोकमत पू. पान क्र.4

सकाळ पू. पान क्र.3



# नशा किती वाईट बघा... रिक्षा चोरून मारायचा भाडे

## सराईत गुन्हेगाराला अटक; आठ गुन्हे उघडकीस

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत धुमाकूळ घालणाऱ्या रिक्षा चोराला पोलिसांनी कर्नाटकमधून अटक केली. शशिकांत मल्लेश कामनोर (३२, रा. लिंक रोड, बोरीवली) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर रिक्षा चोरीचे आठ गुन्हे दाखल आहेत. चोरटा हा स्वतः रिक्षा चालक असून, नशेसाठी रिक्षा चोरून भाडी मारायचा आणि गॅस संपला की तिकडेच रिक्षा सोडून द्यायचा. त्याच्याकडून चोरीच्या सात रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत.

नवघर पोलिस ठाणे हद्दीत सार्वजनिक रस्त्यांवर उभ्या केलेल्या रिक्षा चोरीचे प्रमाण वाढले होते. रिक्षा चोरीच्या वाढत्या गुन्ह्यांबाबत मीरा भाईंदर परिमंडळ १ चे उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहायक आयुक्त राजेंद्र मोकाशी यांनी नवघर पोलिसांना गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. रिक्षा चालक अभिमन्यू कनोजिया (वय ४२) यांची रिक्षा नवघर-फाटक मार्गावरील शिर्डी नगरच्या आशिष बारसमोरून चोरीला गेल्याचे १९ मार्चला समोर आले होते. या रिक्षा चोरीच्या गुन्ह्यासह अन्य गुन्ह्यांचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी, गुन्हे शाखा निरीक्षक अशोक कांबळे, सहायक पोलिस निरीक्षक संदीप पालवे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे आदींसह गौतम तोत्रे, भूषण पाटील, नवनाथ घुगे, ओमकार यादव, सूरजसिंग घुनावत, अस्वर, पवार, कुणाल हिवाळे यांच्या पथकातर्फे सुरू होता.

### कर्नाटकात कारवाई

सीसीटीव्ही फुटेजवरून रिक्षा चोर हा सातत्याने पोलिस ठाणे हद्द परिसरात येऊन रिक्षा चोरीचे गुन्हे करीत असल्याचे आढळून आले. त्याची ओळख पटल्यावर पोलिस पथकाने बोरिवलीच्या आयसी कॉलनी परिसरात शोध घेतला असता, रिक्षा चोरणारा स्वतः रिक्षा चालक असून, त्याचे नाव शशिकांत मल्लेश कामनोर (३२, रा. लिंक रोड, बोरीवली) असे असल्याचे समजले. कामनोर मूळचा कर्नाटकच्या गुलबर्गा जिल्ह्यातील गंजीखेड येथील असल्याचे समजताच पोलिसांनी त्याच्या मूळगावी जाऊन त्याला अटक केली. त्याने नवघर पोलिस ठाण्यात सहा, एमएचबी कॉलनी पोलिस ठाणे हद्दीत दोन, असे आठ गुन्हे केले होते. चौकशीत ७ लाख ६९ हजारांच्या चोरीच्या ७ रिक्षा हस्तगत केल्या आहेत. या कारवाईमुळे अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# भाजपमध्ये अंतर्गत गटबाजी पुन्हा उफाळली

भाईंदर, ता. २३ (बातमीदार) : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदरमध्ये भाजपच्या झालेल्या कार्यक्रमात पक्षातील अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा उफाळून आली. या वेळी मिरा-भाईंदरचे प्रभारी असलेले जयप्रकाश ठाकूर यांच्यासमोरच कार्यकर्त्यांनी एकमेकांशी हुज्जत घालून जोरदार नारेबाजी केली. या वेळी भाजप जिल्हाध्यक्षांच्या अंगावरही धावून जाण्याचा प्रकार घडला.

पक्षाच्या बुथ अध्यक्षांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम मिरा रोड येथे घेण्यात आला होता. कार्यक्रम सुरू होण्याआधी निवेदकाने मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघ प्रमुख ॲड. रवी व्यास यांचे नाव न घेतल्याने व्यास समर्थक संतप्त झाले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेला फलकही काढण्याचा प्रयत्न झाला. यावेळी झालेल्या गोंधळात एक कार्यकर्ता भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांच्या अंगावरही धावून गेला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. हा सर्व गोंधळ पक्षाचे मिरा-भाईंदर प्रभारी जयप्रकाश ठाकूर यांच्यासमोरच घडला. अखेर काही वरिष्ठ नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना शांत केले.

CamScanner

पुढारी पान क्र. ३

# मिरा-भाईंदर शहरात वाहतूककोंडीसह धुळीचे साम्राज्य

## एकाचवेळी खोदकामांचा सपाटा, निवडणुकीपूर्वीच कामे उरकण्याची लगीनघाई



**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिकेला शासनाकडून रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी भरघोस निधी मिळाला आहे.रस्त्यांचे काँक्रीटीकरण आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वीच उरकण्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींची लगीनघाई सुरु झाली आहे. परिणामी पालिकेने एकाचवेळी ठिकठिकाणचे रस्ते खोदल्याने तेथे वाहतूक कोंडीची समस्या उदभवत असून या खोदकामांमुळे परिसरात धुळीचे साम्राज्य देखील पसरत असल्याने त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे.

त्याचे सोयरसुतक कोणाला नसल्याचे दिसून येत आहे. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मोठ्याप्रमाणात सुरु असलेली बांधकामे तसेच ठिकठिकाणच्या आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्रकल्पातून वातावरणात धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्याचा प्रत्यय शासनासह स्थानिक प्रशासनांना आला होता. सुरुवातीला हे धुके असल्याचा कयास लावला गेला. मात्र हे धुके नव्हे तर धूळ असल्याचे स्पष्ट झाल्याने शासनासह स्थानिक प्रशासनाने काही दिवसांपूर्वी डीप क्लिंन ड्राईव्ह मोहीम राबविली.

शहरभर पाण्याचे तुषार उडवून वातावरणातील धुळीवर नियंत्रण मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु केला. सध्या हि मोहीम थंडावल्याचे दिसून आल्यानंतर मिरा-भाईंदरमध्ये पुन्हा धुळीच्या धुक्याने डोके वर काढले आहे. धूळ निर्माण करणाऱ्या बांधकामांच्या ठिकाणी तसेच आरएसमसी प्रकल्पाच्या ठिकाणी पाण्याच्या फवाऱ्याद्वारे धुळीवर नियंत्रण मिळविण्याचा फंडा सुरु करण्यात आला होता. त्याकडे सुद्धा दुर्लक्ष झाल्याने शहरभर धुळीचे साम्राज्य पुन्हा पसरू लागले आहे. रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यासाठी काही लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करून निधी मंजूर करून आणला. यातून शहरातील सुमारे ४५ किलो मीटर पर्यंतच्या ८४ रस्त्यांचे काँक्रिटीकरण प्रस्तावित करण्यात आले आहे.

यातील काही रस्त्यांचे काँक्रीटीकरण एमएमआरडीए तर काही रस्त्यांचे काँक्रीटीकरण पालिकेकडून केले जाणार आहे. हे रस्ते एकाचवेळी खोदण्यात आल्याने धुळीच्या प्रमाणात मोठी भर पडली आहे. याखेरीज खोदकामाच्या ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या उदभवत असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. मुलांच्या परीक्षा सुरु असून त्यांना ये-जा करणे त्रासदायक ठरत आहे. खोदकाम करताना वातावरणात धूळ उडू नये, यासाठी ठेकेदाराकडून पाण्याचा फवारा मारला जात नाही जेणेकरून धूळ वातावरणात उडणार नाही. तसेच ज्या ठिकाणच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यात आल्यानंतर रस्त्याला ठरविक अंतरावर छेद देऊन त्यात डांबर टाकण्यासाठी कटिंग मशीनचा वापर केला जातो. हि मशीन वापरताना पाण्याचा वापर करणे अपेक्षित असतानाही ठेकेदाराकडून त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याने परिसरात मोठ्याप्रमाणात धूळ पसरत आहे.

पुढारी पान क्र. ५

# वसईत ११ घरमालकांवर गुन्हे

**वसई :** परदेशी नागरिकांना पोलिसांच्या परवानगीशिवाय परस्पर घरे भाड्याने देणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. नालासोपारामधील तुळींज पोलिसांनी अशा प्रकरणात ११ घरमालकांविरोधात गुन्हे दाखल करून अटक केली आहे. वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकीकरण होत आहे. विविध राज्यातील तसेच परदेशी नागरिक देखील विविध कारणांसाठी शहरात वास्तव्यासाठी येत आहेत. परदेशी नागरिकांमध्ये नायजेरीयन, बांग्लादेशी आणि इतर आफ्रिकन देशातील नागरिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक गुन्ह्यांच्या प्रकरणात परदेशी नागरिकांचा सहभाग आढळून आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ते देशात प्रवेश करून वास्तव्य करत असतात. त्यामुळे घरे भाड्याने देताना पोलिसांचा 'ना हरकत दाखला' घेणे बंधनकारक होते. मात्र अनेक परदेशी नागरिक पोलिसांच्या अशा दाखल्याशिवाय राहात असल्याचे आढळून आल्यामुळे अशा परदेशी नागरिकांना घरे देणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

पुढारी पान क्र. ९

# १० लाख मिळवून दिले परत

**मिरा रोड :** काशीमीरा परिसरात राहणाऱ्या महिलेला शेयर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन १०,२९,३१२ रुपये फसवणुक केली होती. फसवणूक करण्यात आलेली संपूर्ण रक्कम त्या महिलेला काशिमीरा पोलीस तपास करून परत मिळवून दिली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परीसरात राहणाऱ्या प्रियंका दास पुजा यांना शेयर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. झालेल्या व्यवहाराबाबत माहिती घेवून बँकेसोबत बोलणे करून रक्कम गोठवण्यात आली.

CamScanner

समय भास्कर


# ऑटो चोर को नवघर पुलिस ने किया गिरफ्तार

पंकज दुबे/मीरा-भाईंदर

नवघर पुलिस ने एक ऐसे व्यक्ति को ऑटो रिक्शा चोरी करने के आरोप में गिरफ्तार किया है, जो अपने नशा पूर्ति के लिए पार्किंग मे खड़े ऑटो रिक्शा को अपना निशाना बनाता और चोरी कर अपनी नशे की लत को पूरा करता था।

प्रेस वार्ता मे जोन 1के डीसीपी प्रकाश गायकवाड़ ने बताया कि कुछ दिनों पहले ही नवघर पुलिस स्टेशन में ऑटो रिक्शा चोरी का एक मामला आया था, इसके पहले भी नवघर पुलिस स्टेशन में ऑटो रिक्शा चोरी की कई मामले दर्ज थे, जिस पर पुलिस ने गंभीरता से कार्रवाई की और तकनीकी सहायता की मदद से पुलिस ने आरोपी को बोरीवली से गिरफ्तार कर लिया।

पकड़े गए आरोपी का कोई स्थाई पता नहीं है, यह मूल निवासी कर्नाटक का है, हैरान करने वाली बात यह है की चोरी किए गए ऑटो को यह बेचता नहीं था बल्कि खुद उसे चलाया करता था और जब ऑटो से गैस या तेल ख़त्म हो जाता, तो उसे वह वही छोड, दूसरे ऑटो को मास्टर चाबी की मदत से चुरा लिया करता था।



पकड़े गए आरोपी से पुलिस ने कुल 7 ऑटो रिक्शा को बरामद किया है, जिसकी कुल बाजार मूल्य लगभग 8 लाख है, चोरी हुए इन सभी ऑटो की शिकायत पुलिस स्टेशन में दर्द थी, जिसमें नवघर के 6 और एमएचबी कॉलोनी का एक 1 मामला हैं।

CS CamScanner

समय भास्कर

# बाइक चोर को पुलिस ने किया गिरफ्तार



पंकज दुबे/मीरा-भाईंदर

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले मीरा रोड पुलिस स्टेशन ने बाइक चोर के आरोप मे एक व्यक्ति को गिरफ्तार किया है, मिली जानकारी के अनुसार शिकायतकर्ता ज्योति सिंह अपने निजी कार्य के वजह से शिवार गार्डन की तरफ जाती हैं, और वही से उनकी मोटरसाइकिल पार्किंग से चोरी हो जाता हैं।

ज्योति ने इसकी शिकायत मीरा रोड पुलिस मे स्टेशन मे की, पुलिस ने इस चोरो के मामले को सीसीटीवी की मदद से सुलझा लिया और इस मामले में लिप्त अल्ताफ अली खान को मीरा रोड से गिरफ्तार कर लिया, पुलिस ने आरोपी के से दो मोटरसाइकिल भी जप्त की है। अल्ताफ अली खान के ऊपर 2008 से ही चोरी और जबरी चोरी के कई मामले पुलिस स्टेशन में दर्ज है दर्ज हैं। यह कार्य वरिष्ठ अधिकारियों के मार्गदर्शन में वरिष्ठ प्रश्न निरीक्षक चंद्रकांत सरोदे, पुलिस निरीक्षक मिलिंद साबले, सहायक पुलिस निरीक्षक किरण वंजारी आदि ने किया।

CamScanner

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
24 Mar 2024 - Page 3

# हुड़दंगियों से निपटने के लिए पुलिस तैयार

## शराब पीकर गाड़ी चलाने वालों पर ट्रैफिक पुलिस की पैनी नजर



**वसई।** वसई तालुका में तट समेत कई जगहों पर होली का त्योहार बड़े हर्षोल्लास के साथ मनाया जाता है। इस त्योहार में किसी तरह की गड़बड़ी न हो इसके लिए मीरा-भायंदर,वसई-विरार पुलिस कमिश्नरेट का सिस्टम तैयार किया गया है। शराब पीकर गाड़ी चलाने वालों पर ट्रैफिक पुलिस की पैनी नजर रहेगी,ताकि होली उत्सव के दौरान रंग फीका न पड़ जाए। वसई के समुद्र तट पर भी पुलिस की नजर रहेगी और इसके लिए विशेष पुलिस तैनात की गई है। होली कोली लोगों का एक महत्वपूर्ण त्यौहार माना जाता है। चूंकि वसई-विरार उत्तरी कोंकण का हिस्सा है,इसलिए तालुका में कई स्थानों पर होली बड़े उत्साह के साथ मनाई जाती है। इस त्योहार के लिए नागरिकों ने तरह-तरह से तैयारियां की हैं और इस त्योहार को पारंपरिक तरीके से मनाया जाता है। होलिका दहन भी रात्रि में जलाई जाती है। इसलिए कोई गलती नहीं होनी चाहिए,इसके लिए शहर में पुलिस बल तैनात किया गया है। इसलिए नियमों का उल्लंघन करने वालों पर ट्रैफिक पुलिस कार्रवाई करेगी। वसई में भाबोला,अंबाडी रोड,रेंज नाका, सातिवली, नालासोपारा,विरार में पुलिस नाकाबंदी रहेगी। भीड़-भाड़ वाले स्थानों पर विशेष नजर रखी जायेगी. पुलिस कमिश्नरेट क्षेत्र में कड़ी नजर रहेगी। पुलिस कमिश्नरेट ने कहा कि गश्त के साथ-साथ नाकाबंदी और निरीक्षण भी किया जाएगा।

CamScanner

# विदेशी नागरिकों को रूम देने वाले



## 11 मकान मालिकों को तुलिंज पुलिस ने किया गिरफ्तार




आर.आर. सिंह

**वसई।** विदेशी नागरिकों को रूम किराए पर देने के बाद पुलिस स्टेशन में सूचित नहीं करने पर तुलिंज पुलिस ने 11 मकान मालिकों के खिलाफ कार्रवाई की है। पुलिस अधिकारी ने बताया कि, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के तुलिंज पुलिस स्टेशन अंतर्गत प्रगतिनगर और मोरेगांव क्षेत्रों में,बड़ी संख्या में विदेशी नाईजीरियन और अन्य अफ्रीकी देशों के नागरिक किराये पर घर ले रहे हैं। विदेशी अधिनियम, 1946 की धारा 7 के तहत, व्यवसायिक आधार पर किसी भी विदेशी नागरिक की जानकारी 24 घंटे के भीतर स्थानीय पुलिस को सूचित करना अनिवार्य है। ऐसा नहीं करने पर उनके खिलाफ मामला दर्ज करने का प्रावधान है। पुलिस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार ने सीआरपीसी 1973 की धारा 144 (1) (2) के तहत आदेश पारित किया। निषेधाज्ञा आदेश के अनुसार होटल, लॉज, गेस्ट हाउस, क्लब आदि में विदेशी नागरिक किराये पर मकान लेने आते हैं तो उनकी सूचना निर्धारित प्रपत्र में 24 घंटे के अंदर पुलिस को देना अनिवार्य है। निषेधाज्ञा पारित होने के बाद पुलिस ने समाचार पत्रों और पोस्टरों के माध्यम से समाज में जागरूकता पैदा की थी। चूंकि कुछ मकान मालिकों ने अपने घर पर रहने के लिए आने वाले नाईजीरियन और अन्य अफ्रीकी नागरिकों के बारे में पुलिस स्टेशन को सूचित नहीं किया था,कुल 11 मकान मालिकों के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया और मकान मालिकों को गिरफ्तार कर अदालत में पेश किया गया। उक्त गृह मालिकों के विरुद्ध न्यायालय में आरोप पत्र दाखिल कर आरोपित गृह मालिकों को कारावास व जुर्माना भुगतना होगा।

CamScanner